NAVSHAKTI, SATURDAY,

FEBRUARY 24, 2018

जिल्ह्यात ... उभारण्यात आलेल्या छावण्याची चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार राज्य सरकारनेही संबंधीत अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले परंतू अद्याप छावणी संचालकांवर कारवाई होत नसल्याकडे अॅड. आशिष गायकवाड यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. यावेळी सरकारी वकील अॅड. प्राजक्ता शिंदे यांन बिड जिल्हा वगळता अन्य चार जिल्ह्यांमध्ये गुन्हे दाखल केल्याची माहिती न्यायालयाला दिली. यावेळी न्यायालयाने संताप व्यक्त केला. घोटाळ्या प्रकरणी आठ दिवसात गुन्हे दाखल करा. गुन्हा दाखल करण्यास जर संबंधीत अधिकाऱ्या दिरंगाई करत असतील तर ते आता खपवून घेतले जाणार नाही. त्यांच्या विरोधात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी फौजदारी कारवाईचा बडगा उगारला जाईल. अशी तंबी दिली. तसेच छावणीचे संचालकानी कारवाई टाळण्यासाठी जर कनिष्ट न्यायालयात धाव घेतील तर न्यायालयाने दिलासा देऊ नये, असे ही न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले.

तेलुगू साहित्याचा पुल बांधणारे आणि आपल्या आशयघन कवितांनी अवघ्या मराठीजनांना प्रिय असलेले कवीवर्य लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे आज सायंकाळी येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर श्निवार दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता अत्यंसंस्कार करण्यात येणार आहे. कवीवर्य बोल्ली यांच्या पश्चात पत्नी शोभा बोल्ली, दोन मुले, तीन विवाहित मुली, बंधू सत्यनारायण बोल्लीअसा परिवार आहे. रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना घरी पाठविण्यात आले होते. त्यांची प्रकृती ठिक होती. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास लेखनासाठी बसले असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

तेलुगू आणि मराठी भाषेच्या आंतरभारतीची भूमिका घेऊन ते आयुष्यभर लेखनमग्न राहिले. प्रख्यात नाटककार म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

# लोकलमध्ये पत्रकाराला मारहाण करणाऱ्या पाचजणांना अटक

**प्रतिनिधी**



मुंबई, शुक्रवार – पश्चिम रेल्वेच्या एका उपनगरीय लोकलमध्ये पत्रकाराला बेदम मारहाण करुन चालत्या लोकलमधून फेंकून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाचजणांच्या एका टोळीला अंधेरी रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. सर्व आरोपी नालासोपारा येथील रहिवाशी असून त्यांना उद्या येथील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले आहे. विशाल आत्माराम डोंगरे, विवेक मारुती धुमाळ, रविंद्र रमेश राणावडे, संजय भागूजी आंबावले, राजेश गंगाराम गोठल अशी या पाचजणांची नावे असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी सांगितले. सुधीर शुक्ला हे पत्रकार असून ते मिरारोड येथे राहतात. २१ फेब्रुवारीला ते मिरारोड रेल्वे स्थानकात सात वाजता आले होते. चर्चगेटकडे जाणाऱ्या एका उपनगरीय लोकलमध्ये चढल्यानंतर दरवाज्यावर उभ्या असलेल्या एका टोळीने त्यांना आत जाण्यास मज्जाव केला होता. त्यानंतर या टोळीने त्यांना बेदम मारहाण केली होती. त्यांनी या आरोपींचे मोबाईलवरुन फोटो काढण्याचा प्रयत्न केला, यावेळी या आरोपींनी त्यांनाच गाडीतून ढकलून फेंकून देण्याचा प्रयत्न केला.

हल्ल्यात सुधीर शुक्ला हे गंभीररीत्या जखमी झाल्याने त्यांच्यावर जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी अंधेरी रेल्वे पोलीस ठाण्यात संबंधित हल्लेखोरांविरुद्ध तक्रार केली होती. या प्रकरणी चार ते पाच आरोपींविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्यांची पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी गंभीर दखल घेत आरोपींच्या अटकेसाठी सात विशेष पथकाची नियुक्ती केली होती.

# ...क शिवसेनेसाठी महत्त्वाचे – उद्धव

...भेट घेतली व शिवसेनेमध्ये प्रवेश केला ...होता. या घटनेला आज २० वर्षे पूर्ण ...झाली. त्यानिमित्त शिवसेनेतील माझी ...० वर्षे' हे पुस्तक प्रकाशित केले.

ठाकरे म्हणाले, नीलमताई,तुमची ...० वर्षे माझ्या डोळ्यासमोर आहेत. ...आज जरी ही २० वर्षे भरकन उडू ...ल्यासारखी वाटत असली तरी,या ...० वर्षात पक्षासमोर अनेक आव्हाने ...ते. यात भली-भली माणसे थकली ...सती.मात्र नीलमताई जिद्द आणि ...चिकाटीने पक्षासोबत राहिल्या व ...क्षाची त्यांनी प्रभावीपणे बाजू ...डिली. आज शिवसेना आणि ...नीलमताई हे समीकरण पक्के आहे.

...राऊत म्हणाले, जिथे गरज ...सेल,तिथे नीलमताई सरकारच्या ...गोदर त्या ठिकाणी पोहोचतात. ...शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ...च्यामुळे सर्वसामान्य माणसाला ...ओळख मिळाली. यातून ...नीलमताईंसारख्या सामाजिक क्षेत्रात ...म करणाऱ्या व्यक्ती शिवसेनेत आल्या.त्या अतिशय कडवट पद्धतीने काम करतात आणि त्यांच्या कामातून आपल्याला प्रेरणा मिळते.

नीलम गोऱ्हे म्हणाल्या, जेव्हा जेव्हा महाराष्ट्रावर आपत्ती आली तेव्हा तेव्हा शिवसेना पुढे आली. मग ते मुंबई बॉबस्फोट प्रकरण असो,लातूरचा भूकंप असो,शिवसेना कायमच पुढे राहिली आहे. लातूर भूकंपाच्या वेळी पिडीत विधवा महिलांच्या प्रश्नावर मी काम करत असताना ,शिवसेनेने तेथे केलेलं काम मी त्यावेळी जवळून बघितला. उद्धवजींशी १९९८ साली भेट झाल्यावर त्यांनी बाळासाहेबांशी भेट घडवून दिली. उद्धवजींनी कायमच महिलांचे सुख दुःख समजून घेतले. कोठेवाडी प्रकरणात सुद्धा उद्धवजी तेथील महिलांच्या मागे भक्कमपणे उभे राहिले. शिवसेना महिला प्रश्नांवर मोठ्या प्रमाणत लक्ष देत आहे. उद्धव ठाकरे यांचे शेतकरी प्रश्नावरचे काम प्रेरणादायी आहे, असे त्यांनी सांगितले.

TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street,
Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यांत येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या व नॅशनल स्टॉक एक्स्जेंज ऑफ इंडिया लिमिटेड व बीएसई लिमिटेडच्या व्होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध असलेल्या परपेच्युअल हायब्रीड सिक्युरिटीजचे वितरण खालीलप्रमाणे होणार आहे :

| अ. नु. | परपेच्युअल हायब्रीड सिक्युरिटीज (पीएचएस) | वितरणाची नियत तारीख | प्रदान वितरणासाठी अभिलेख तारीख |
|---|---|---|---|
| १ | एकूण रु. १५०० कोटींच्या १८ मार्च, २०११ रोजी वाटप केलेल्या ११.८०% पीएचएस (ISIN:INE081A08165) | १८ मार्च, २०१८ प्रदान केले जाणार आहे १९ मार्च, २०१८ रोजी. | १३ मार्च, २०१८ |

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
२३ फेब्रुवारी, २०१८ सौ. अनिता कल्याणी
मुंबई इंटेरिम कंपनी सेक्रेटरी

TATA STEEL